Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# डॉ. मीना सुधाकर प्रभू यांचे प्रवास वर्णन 'वाट तिबेटची' यातील धार्मिक-सांस्कृतिक वातावरण

**प्रा. सतीश प्रकाश अहिरे,** मु. पो. मळाणे, ता. जि. धुळे (महाराष्ट्र)

**प्रस्तावना**

डॉ. मीना सुधाकर प्रभू या एक डॉक्टर आणि मराठी लेखिका आहेत. त्यांचा जन्म आणि शिक्षण पुणे शहरात झाले आहे. त्यांनी एम.बी.बी.एस. हे पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमधून पूर्ण केले आहे. त्यानंतर मुंबईला जाऊन त्या डी.जी.ओ. झाल्या. सन १९६६ मध्ये लग्न झाल्यानंतर त्या इंग्लंडमध्ये स्थायिक झाल्या. त्यांनी सुमारे वीस वर्षे लंडनमध्ये भूलतज्ज्ञ आणि जनरल प्रॅक्टिशनर म्हणून काम केलेले आहे. डॉ. मीना प्रभू यांनी जगातल्या अनेक देशांत प्रवास करून प्रवास वर्णने लिहिली आहेत. त्यांच्या आर्किटेक्ट पतीने यासाठी त्यांना उत्तेजन दिलेले दिसून येते, यासोबतच पुरेसे आर्थिक पाठबळ देखील दिलेले दिसून येते.

**संबोध शब्द**

सांस्कृतिक, धार्मिक, मेजवानी, प्रमाणबद्ध, धर्मगुरू, तटबंदी, तिबेट, वैद्यकीय क्षेत्र, सांस्कृतिक ठेवा, प्रवर्तक व भारत इत्यादी.

**विषय प्रवेश**

डॉ. मीना सुधाकर प्रभू यांनी 'वाट तिबेटची' या पुस्तकाची चौथी आवृत्ती एप्रिल २०१९ मध्ये प्रकाशित करून वाचकांना सांस्कृतिक व धार्मिक मेजवानी दिली आहे. तिबेटचा कालपट मांडताना इ.स.पूर्व ते २००७ पर्यंतचे सर्वच सविस्तरपणे त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तिबेटची सांस्कृतिक धार्मिक बाजू मांडताना त्यांनी ल्हासा, ड्रेपुंग विहार, गॅडेन विहार, नॉर्बुलिंग्का राजवाडा यांचे सविस्तर वर्णन केले आहे. त्यातून वेगवेगळ्या परंपरा वेशभूषा यांचा सविस्तर विचार मांडला आहे.

चीनी सत्तेपुर्वी समाजाचे तीन प्रमुख भाग होते –

१. धर्मगुरू (लामा),
२. बहुजन वर्ग (शेतकरी) व
३. उच्च वर्ग (सरदार).

त्यात उच्च वर्णीयाचे दोनशेच्या आसपास कुटुंबे होती. परंतु धर्मगुरू 'लामा' होणे सन्मानाचे होते. ते ब्रम्हचारी असत. मोठ्या प्रमाणावर शेतकरी वर्ग होता, त्यांची घरे माती दगडाची होती. भटक्या स्वरुपात याक पाळणे व फिरणे हे ते करत असत. कमी प्रतीच्या खिडक्या ऐवजी झरोके असणारी त्यांची घरे होती. श्रीमतांचे घरे तटबंदी असणारी होती. गाव घरांची रचना बौद्ध धर्माची जाण करून देणारी होती.

त्यांच्या प्रवास काव्यात असणारी सांस्कृतिक परिपूर्णता हि केवळ संस्कृती म्हणून नाही तर त्यातून धर्माचा मोठा आधार देणारी होती. चीनचे अधिपात्याचा असणारा वारसा व त्यातूनच बौद्ध धर्माचा विषय या ठिकाणी होताच. त्यांचे सर्व बाजूनी मिमांसा करणे गरजेचे आहे. त्यातून धर्माचे आधारावर चालणारे दैनदिन जीवन जे व्यक्तीत्व परिपूर्ण करते याची सर्वांगीण जाणीव करून घेणे गरजेचे आहे.

राजकीय परिस्थिती त्यातून तेथील व्यापार शेती व इतर बाबीवर कोणते परिणाम झाले याचा विचार या ठिकाणी करणे गरजेचे आहे. स्वतंत्र देश म्हणून निर्माण होवू घातलेले अस्तित्व त्यातून चीनचे वर्चस्व व होणारे परिणाम या सर्व बाजूची पाहणी करणे गरजेचे आहे. अनेक देशाची भ्रमंती करत त्याठिकाणी असणारी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

राजकीय, सामाजिक, परिस्थिती, सांकृतिक वारसा, धार्मिक परिस्थिती, देशातील आर्थिक उन्नती याच बरोबर स्वातंत्र्य या सर्व बाबीची माहिती घेत लेखिका या ठिकाणी तिबेटला भेट देत त्यातून त्यांनी संदर्भ देत तेथील परिस्थितीची जाणीव करून दिली आहे.

वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या व जगाची सफर करून अनेक देशाची माहिती आपल्या समोर लिखित स्वरुपात मांडण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. प्रवासातील लिखाण हे त्यांचे कोणत्या जीवन दृष्टीचा आढावा घेणारे आहे हे पाहणे गरजेचे आहे त्यातून त्यांनी प्रत्येक बाबीतील त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा सहजभाव आपणास प्रेरणा देणारा आहे.

ठीक नऊ वाजता पेम्बा गाडीनिशी आला. मी तयार होतेच. ड्रेपुंग विहार ल्हासापासून सात-आठ किलोमीटर्सवर पंधरा मिनिटात पोहोचलो. या देशात परदेशी पर्यटकांना (ची सोडून अर्थात ते स्वतःला 'परदेशी' समजताच नाहीत) एकट हिंडण्याची परवानगी नाही. त्यातून बौद्ध विहारांमधे मार्गदर्शकाखेरीज प्रवेशच नाही. या गाईडकम हेरासाठी रोजचे तीनशे युवान (एकवीसशे भारतीय रुपये) आपल्याला द्यावेच लागतात त्याखेरीज गाडीभाड आणि प्रवेश शुल्क हे वेगळे द्यावे लगते. त्यातल्या त्यात आनंदाची गोष्ट म्हणजे पेम्बाच इंग्लिश बर होत. व्याकरणाच्या चुका करत असला तरी ते समजत होत. तो सांगत असलेली माहितीही वाचीव माहितीशी जुळत होती. म्हणजे तो ठीक सांगत होता.[१]

तिबेटी बौद्ध धर्मगुरू गेलुग्पा यांनी १४१६ मध्ये डेपुंग विहार त्झोन्खाबा यांचे स्मरणार्थ बांधला तो धार्मिक आधारावर बांधलेला उत्कृष्ट सांस्कृतिक ठेवा आहे. जणू काही भाताच्या राशीच आहेत असे वर्णन केले आहे. त्यातून दिसणारे नयनरम्य दृश्य आपणास आकर्षित मिळत आहे. उंच देवळे व दगडी घरे त्यातून असणारी बाहेरील तटबंदी, स्तंभ, रंगीबेरंगी पताका दिसतात. ते उडणाऱ्या पक्षा सारख्या दिसतात. पेम्बायाचे कडून पुढच वर्णन घेताना या विहारात दहा हजार लामा राहत होते, धार्मिक शिक्षणाची सोय येथे करून दिलेली होती. त्यातून सर्व लामा येथील लोकांसाठी प्रार्थना करत असत. उच्च शिक्षण भारतातील नालंदा विद्यापिठासारखे होते असे दिसून येते. "मधली मूर्ती त्झोन्खाबा यांची आहे. तुम्हाला त्यांची थोडी माहिती असेलच. चौदाव्या शतकातले है भदन्त अतिशय बुद्धिमान होते. त्यांनी वयाच्या तिसऱ्या वर्षी बौद्ध धर्माची शिक्षा घेतली. त्यांची ग्रहणशक्ती अफाट, एकपाठी असल्याने सर्व अभ्यास एकोणिसाव्या वर्षी संपवून ते विसाव्या वर्षी विहारांमध्ये शिकवू लागले. वादविवादात ते अत्यंत प्रवीण होते. सबंध तिबेटमध्ये प्रवास करून धर्माची स्थिती किती खालावलेली आहे ते त्यांनी पाहिलं आणि त्याला आतिशा महागुरूच्या वेळची प्रतिष्ठा देण्यासाठी नवा पंथ स्थापन केला. बोधीत्सव मंजुश्री आणि आतिशा यांचाच ते पुनर्जन्मित अवतार मानले जातात."[२]

पुढे वर्णन करतांना त्या लिहितात, "त्यांच्या दोन बाजूना बसलेले दोघेजण हे त्यांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनीच १४१६ मध्ये हा विहार स्थापन केला. शिक्षणाच्या उत्तम सोयींमुळे तो लवकरच विख्यात झाला. संपूर्ण बौद्ध जगातून विद्यार्थ्यांच्या रांगा लागू लागल्या. एका वेळी दहा हजार विद्यार्थी इथं शिकत. बुद्धाच्या शिकवणीच हे सर्वांत मोठ अध्यासन होते."[३]

आजूबाजूला विद्यार्थ्यांची फारशी हालचाल दिसत नव्हती. माझ्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह पाहून पेम्बा म्हणाला, चीनी सांस्कृतिक क्रांतीमधे या विद्यापीठाची फार नासधूस झाली. चाळीस टक्के इमारती तरी धुळीला मिळाल्या. पण सुदैवानं काही महत्वाच्या शाबूत आहेत. इथल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरही तेव्हा घाला आला. आता केवळ चारशे जन शिकत आहेत. मूर्तीची स्थापना करते वेळी मधली मूर्ती त्झोन्खाबा यांची ते अतिशय


Copyright © | JET Network, All Rights Reserved

बुद्धिमान होते. तीन वर्षाचे असता दीक्षा घेतली त्यांचे नावाने चालणारा हा ड्रेपुंग विहार ड्रेपुंग म्हणजे भाताची रास होय. चीनच्या सांस्कृतिक क्रांतीमध्ये विहाराची फारच नासधूस झाली दलाई लामा हा विहार चीन च्या ताब्यात गेल्यानंतर भारतात परांगदा झाले. भारतात कर्नाटकात मुंदगोडला वास्तव्यात आहेत. असे धार्मिक उदाहरणे देण्यात आलेले आहेत.

दूर टोकाशी, खोल गाभाऱ्यात मंजुश्री बुद्धाची सुवर्णांकित, दोन मजली उंच, हास्यवदन मूर्ती. तीही नखशिखान्त सजलेली. भोवती पाच प्राचीन दलाई लामा. शिवाय लाल हयग्रीव्ह आणि नीला वज्रपाणी या दोन हिंदू देवतांची त्यांचे संरक्षक म्हणून योजना. भिंतीवर बोधिसत्वांच्या मूर्ती कोरलेल्या. बुद्धाच्यामागे काचेच्या कपाटात दुबाजुना आठ-आठ 'अर्हता' चे, म्हणजे तिबेटमधे बौद्ध धर्म प्रसार केलेल्या हिंदी पंडितांचे पुतळे. मंजुश्रीसकट झाडून साऱ्या मूर्तीच्या कपाळी कुंकुम टिळक लावलेले, सगळया सजावटी लाल नि पिवळया. एका जागी उंचावर बौद्ध ग्रंथामधले उतारे लिहिलेले कापडी पडदे टांगून ठेवले होते. त्यांच्याखालून गेल कि दुष्ट, पापी आल्यांचा प्रभाव जाऊन तुमचे रक्षण होत या भावनेने पेम्बाने मलादेखील तिथून काढल, ज्याचं अस्तित्व कुठेही, कुणीही कुठेही सिद्ध केलेल नाही अशा 'आत्मा' या कल्पित गोष्टीचा केवढा बाऊ? हे पाहून मला हसू आले व भीती हे वाटली. "या पूजा, हे धूप घालन, हि फुल नि पाण्याची भांडी ठेवण हे सगळ बुद्धपूर्व काळातल्या 'बॉन' धर्मातून आलेल आहे. मूळ बौद्ध धर्मात यातलं काही नव्हत. "पेम्बा महणाला " तुला हव तर म्हण तस", मी म्हणाले, "यातल बहुतेक सगळ आमच्या हिंदू धर्मातही आहे. अखेरीस बौद्ध धर्मच जर तिथून आला आहे तर त्यासोबत त्याचे हे शेशावशेषही आले असणार."[४]

या ठिकाणचे वेगळे वैशिष्टे म्हणजे बुद्धांची सुवर्णांकित मूर्ती यांचे रक्षक म्हणून हिंदू देवतांची केलेली निवड अत्यंत प्रभावी. हे चित्रण भारताशी असणारे संबंध सांगणारी होती. कापडी पडदे व त्यावर लिहिलेली उतारे पापे कमी करणारे ठरवतात तर आत्मा पाच मोठा बाऊ केलेलं जाणवते. पूजा धूप घालणे हे सर्व काही हिंदू धर्म संस्कृतीचा वारसा सांगणारी आहेत. "आता आपण इथल्या शाक्यमुनी देवालयात जाणार आहोत. याची खासियत म्हणजे 'जम्प' किंवा भविष्यकालीन बालबुद्धाचा तीन मजली पुतळा. बारा वर्षे वयाच्या बुद्धाचा हा भव्य पुतळा तीन मजल्यांवरून, मुख्य, मध्य आणि पद अश्या तीन पातळयांवरून पहिला. त्याच्या भव्यतेत कल्ला हरपली नव्हती पाहत रहाव असं कोरीवकाम चकित करत होत. इथं त्झोन्खाम्बाचाही पुतळा होता. इतर अर्हता हजेरी लावत होते. धर्मगुरुच्या मंत्र पठनांचा सभामंडप हे इथल मोठ वैशिष्ट्य होते. खांबांच्या तळाशी लाल आळवणी, रेशमाच्या चार इंची उंच बैठका, त्यांच्यावर शेकडो महंत बसून एकत्र प्रार्थना करणार. मंत्र पठन करणार त्याचा उद्घोष कानी पडावा अशी फार इच्छा होती पण ते काही शक्य झाले नाही.

दलाई लामांच्या खोल्या दुरून पाहिल्यानंतर महंतांच्या, विशेषतः बाल महंतांच्या सर्वात महत्वाच्या जागी म्हणजे मूदपाक खाण्यात पोहोचलो. खूपच मोठा थोरला, चौकोनी भटारखाना, विटाची जमीन, मधे चौकोनी कट्टा, वर लंब दांडनची, तांब्याचे जुनी भांडी ओळीने लावलेली, जमिनीवर भल्या थोरल्या कढ्या, पातेली नि तपेली, चार तांबटानी आत बसून ठोकून बनवावी तशी अचाट. त्यांच्या मोदकपात्रासारखा घुमती झाकण्या. दहा हजारांसाठी नुसती कांजी शिजवायची म्हटलं तरी अशी राक्षसी भांडी हवीत कडेला मोठा चुल्हाना. त्यांत सारलेल्या अन झाडांच्या ओंडक्याचा धूर पसरतोय. मधेच ठिणग्यांद तुंबळ उठतय, भिंती, छत, जमीन... सगळयांवर धुराध काळकुट्ट कितन चढलेल."[५]


Copyright © | JET Network, All Rights Reserved

धार्मिक व सांस्कृतिक बाबीची माहिती देणारे वर्णन सांगताना सिंहासन, शाक्यमुनी देवालय, जाम्पा या भविष्यकालीन बुद्धाची मूर्ती त्यातील मुख्य, मध्य, पर या पातळीवरील कोरीवकाम अत्यंत चकित करणारे आहे. सभामंडप हे वैशिष्ट्यूर्ण लालवणी रेशमाच्या उंच बैठकानी सजले होते. या सोबतच भटारखाना त्यातील गुहा तांब्यांची भांडी. मोरपात्र चुल्हाणा व त्या स्वयंपाकघराची धुरानी झालेली काळी भिंत हे त्या कालच्या संस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या आहेत. मेकॉंगचे नाव मोठे समर्पक म्हणावे लागेल, मे म्हणजे मदर (आई) व कॉंग हे नदीचे खर नाव. या सहाही राष्ट्रांसाठी ती मातेच्या माणसारखी विशाल व दयाळू आहे. तीच पाणी पिण्यासाठी तर उपयोगी पडतच, पण तिच्या काठचा प्रदेश सुपीक बनल्याने तिथ भरपूर पिक घेता येत. लाखो एकरात फळा-फुलांच्याबागा बहरतात. मासेमारीमुळे श्रीमंतांपासून गरीबापर्यंत सर्वांचंच पोट भरत. धदे जोडधंदे, हजारोंना रोजगार व निवारा देतात. आता या नदीत अलिशान हाउसबोटीत राहणे. शेकडो किलोमीटर चा प्रवास करणे, एका देशातून दुसऱ्या देशात प्रवेश करणे हे गोऱ्या पर्यटकांमध्ये कमालीचे लोकप्रिय होत आहे. त्यामुळे मेकांग नदीतील वर्दळही बरीच वाढलेली दिसून येते.

मेकॉंग नदीच्या काठावर सुपीक जमिनीत मुख्य पिक काढण्यात येत ते म्हणजे भातच. त्यामुळे त्यापासून बनवण्यात येणारी राईस वाइन, दक्षिण पूर्व आशियात सर्वच राष्ट्रांमध्ये कमालीची लोकप्रिय आहे. तसेच मेकॉंग डेल्टात आंबा. फणस, रांबुतन, पमिलो आदी ट्रॉपीकल फळांची रेलचेल असते. त्यापासून फ्रूट वाईन बनते. त्या बनवण्याच्या अनेक घरगुती डीस्टीलरिज किनाऱ्या-किनाऱ्यांवर दिसून येतात. त्यापैकी एका वाईन डीस्टीलरीला भेट दिली व राईस वाईन बनवण्याच प्रात्यक्षिक पाहिलं. प्रथम तांदूळ पाण्यात काही तास भिजवतात व नंतर शिजवतात. मग शिजलेला तांदूळ ठराविक जार मध्ये आठ-नऊ दिवस ठेवण्यात येतो. त्यात यीस्ट टाकल्याने तो चांगला फरमेंट होतो. मग गाळून त्याची राईस वाईन तयार होते. चवीलाही टी चांगली असते. पण मला फुट वाईन अधिक आवडली. निरनिराळ्या व्हरायटीजची चव चाखत आमचा नाल्या नाल्यांमधून प्रवास सुरूच होता. याच वेळेस नाल्यांच्या प्राण्यातून छोटया-छोटया बोटीतून स्थानिक नागरिकांचीही जा-ये सुरु होती. काही होडया तर महिला वल्हवत होत्या. कोणी भाजीपाला घेऊन जात होत, तर मुलांना शाळेत पोहचवण्यात येत होत. मधूनच बांधकामाच्या साहित्याची ने-अन थोडना मोठ्या बोटीतून चालु होती. पर्यटकांनी नारळपाणी, शीतपेय किंवा हस्तकला वस्तूंची खरेदी करावी म्हणून विशेषतः महिला विक्रेत्या वल्ही मारत घिरट्या घालत होत्या. त्यांच्याकडे केळयांचे गोड वेफर्स, नारळाचे कप व अन्य वस्तू होत्या. त्यांना आमच्यासारखे भरपूर गिरहाईकही मिळत होते."[६]

तिबेट आणि चीनचे प्रवासात आपण मेकॉंग नदीचे नाव व यागत्सी नदी या दोनही नद्याच्या खोऱ्या असणारी संस्कृती व धार्मिक विचार याची सविस्तर माहिती आढळते. नदी भोवतालचा परिसर, विहार, पॅगोडा, मठ सारख्या या परिसराची धार्मिक बाजू सांगत आहेत, तसेच नदी काठाची शेती, उज्वल परंपरा व त्यातून आनंदी वातावरण याचीही जाणीव सांस्कृतिक विविधता दर्शवणारी आहे. प्रवास वर्णनातील लेखनाचा पाठपुरावा करणारी आहे. तिबेटचा विचार करता बांधलेले धार्मिक बौद्ध विहार त्यांना निसर्गातील भाताचे शेत असं शोभणारे नाव दिल ते योग्यच आहे. बांधकाम व त्यातील तटबंदी धार्मिक शिक्षणातील सोयी व संरक्षणासाठी महत्वाची आहे असे वाटते. ल्हासा मध्ये मार्गदर्शका शिवाय फिरता येत नाही. ही राजकीय दडपणाची वास्तव दाखवणारी बाब आहे.

थोडक्यात 'वाट तिबेटची' या प्रवास वर्णनाच्या माध्यमातून डॉ. मीना प्रभूजींनी तिबेटच्या भौगोलिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वाटचालीचा आढावा अत्यंत प्रमाणबद्ध भाषेत वाचकापर्यंत आणण्याचा प्रयत्न


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

केला आहे. त्यातील सर्व बाबी त्यांनी सविस्तरपणे मांडल्या आहेत त्यातील धार्मिक पार्श्वभूमीचा परिचय त्यांनी बौद्ध धर्माचे गाढे अभ्यासक डॉ.आ.ह.साळुंखे यांच्याशी चर्चा करून दिला आहे. त्याच बरोबर बौद्ध धर्माचे भारतातील आधुनिक प्रवर्तक डॉ. धर्मानंद कोसंबी यांच्या पुस्तकातील संदर्भानी झाला आहे.

**संदर्भ**

१. प्रभू डॉ. मीना सुधाकर, "वाट तिबेटची" पुणे पुरंदरे प्रकाशन, चौथी आवृत्ती, एप्रिल, २०१९, पृ. क्र. २०९
२. वही पृ. क्र. २११
३. वही पृ. क्र. २१२
४. वही पृ. क्र. २१६
५. वही पृ. क्र. २१७
६. वही पृ. क्र. १८९


Copyright © | JET Network, All Rights Reserved